## निशाणी क्र.४४ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज त्याच्या हक्कात पारीत केलेल्या तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अंमलबजावणी साठी मागेल तेव्हा पोलिस संरक्षण मिळण्याबाबत दाखल केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन की, वादी हा दावा मिळकतीचा मालक आणि ताबेदार आहे. वादीने दावा मिळकतीची दादाराव वानखेडे याच्याकडुन नोंदणीकृत खरेदी खताने खरेदी केलेली आहे. वादीच्या नावे दावा मिळकतीची नगरपरिषद सिल्लोड यांच्या महसुल दप्तरी मालक आणि कब्जेदार म्हणुन नोंद करण्यात आलेली आहे. प्रतिवादीने वादीच्या ताब्यास अडथळा निर्माण केल्यामुळे वादीने प्रतिवादीच्या विरोधात दाखल केलेल्या दाव्यामध्ये मा. न्यायायलाने दि. ०८/०१/२०२१ रोजी वादीचा नि.क्र.५ वरील तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज मंजुर करुन प्रतिवादीला पावबंद केले आहे. प्रतिवादी हा हेतुपुरस्करपणे न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करुन वादीच्या ताब्यास अडथळा निर्माण करीत आहे. प्रतिवादीने दि. १५.०१.२०२१ रोजी दावा मिळकती वरती येऊन वादी आणि वादी क्र. २ च्या पत्नीस अर्वाच्य भाषेत शीवीगाळ करुन दावा जीवे मारण्याची धमकी देऊन त्यांच्या विरोधात अॅट्रॉसिटीचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली आहे. प्रतिवादीच्या अडथळ्यामुळे वादीला दावा मिळकतीचा उपभोग घेणे अशक्य असल्यामुळे पोलिस संरक्षण मिळण्याची मागणी केली आहे.

३. प्रतिवादीने अर्जावरती त्याचे म्हणणे दाखल करुन अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादीचे थोडक्यात कथन की, वादीचा दावा मिळकतीवरती ताबा नाही. वादी हा आडदांड प्रवृत्तीचा असुन प्रस्तुत अर्जाद्वारे पोलिसांच्या मदतीने दावा मिळकतीचा ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. प्रतिवादी आणि त्याच्या नातेवाईकांनी वादीला कधिही शिवीगाळ करुन धमकी दिलेली नाही.

४. वादी आणि प्रतिवादीच्या वकीलांचा युक्तिवाद एकला. वादीच्या वकीलांनी प्रतिवादी हा न्यायालयाच्या आदेशाचे जाणिवपुर्क उल्लंघण करुन वादीच्या ताब्यास अडथळा निर्माण करीत आहे. प्रतिवादीने निशाणी क्र. ५ च्या अर्जावरील आदेशाच्या नाराजीणे कोणतेही अपील दाखल केलेले नाही. प्रतिवादी हा वादीला जीवे मारण्याच्या आणि देईन अॅट्रॉसिटीच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्याच्या धमक्या देत आहे. प्रतिवादी हा वादीला दावा मिळकतीमधुन बेदखल करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे वादीला दावा मिळकतीच्या वापरासाठी पोलिस संरक्षण देण्याची मागणी करुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. या उलट प्रतिवादीच्या वकीलांनी वादी हा पोलिसांच्या मदतीने दावा मिळकतीचा ताबा घेण्याचा प्रयत्न करीत असल्याचा युक्तीवाद केला आहे. दावा मिळकत ही प्रतिवादीच्या ताब्यात असुन वादीचा दावा मिळकतीवरती कधीही ताबा नव्हता. प्रतिवादीने वादीला धमक्या दिल्याबाबत पोलिसांकडे खोटी तक्रार केली आहे. वादीच्या तक्रारी वरुन पोलिसांनी प्रतिवादीकडे कोणतीही विचारणा केलेली नाही. प्रतिवादी हा निशाणी क्र. ५ च्या आदेशाच्या विरोधात वरिष्ठ न्यायालयात दाद मागनार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंकुर केला तर तो पोलिसांच्या सहाय्याने दावा मिळकतीवरती ताबा मिळवण्याचा प्रयत्न करीत असुन वादीला पोलिस संरक्षण दयावे अशी कोणतीही परिस्थीती नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

५. अर्ज आणि लेखी म्हणणे वाचले. दाव्याच्या अभिलेखाची पाहणी केली. प्रस्तुत दाव्यात वादीचा नि. क्र. ५

वरील वादीचा तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज मंजुर करुन दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादीला वादीच्या दावा मिळकतीवरील ताब्यास अडथळा करण्यापासुन पावबंद केलेले आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे वादी हा दावा मिळकतीच्या शांततामय वापरास प्रतिवादी तर्फे अडथळा होत असल्यामुळे पोलिस संरक्षणाची मागणी करीत आहे. प्रतिवादीच्या कथना प्रमाणे वादीचा दावा मिळकतवरती ताबा नाही. परंतु निशाणी क्र. ५ च्या आदेशावरुन प्रथमदर्शनी वादीचा दावा मिळकतीवरती ताबा असल्याचे दिसुन येत असल्याचा निश्कर्ष नोंदवल्यामुळे वादीचा दावा मिळकती वरती ताबा नाही हा प्रतिवादीचा युक्तिवाद मान्य करता येनार नाही.

**६.** वादीने प्रतिवादीने त्याला जीवे मारण्याच्या आणि ॲट्रॉसिटीचा खोटा गुन्हा दाखल केल्याचा आरोप करुन गंभीर परिस्थीती उद्भवल्यामुळे वादीला पोलिस संरक्षण देण्याची मागणी केली आहे. त्यासाठी वादीने मा.मद्रास उच्च न्यायालयाच्या ***एन. कर्पागम आणि इतर वि. दैवानैम्मल उर्फ दैवथल उर्फ दैवथयी अम्मल, ए आय आर २००३, मद्रास २१९***, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या ***निराबाई जे पाटील वि. नारायण डी पाटील, २००४ (२) महा. एल.आर २७४*** आणि मा.कलकत्ता न्यायायाच्या ***सुनिल कुमार हैदर आणि इतर वि. निशिकांता भंडारी आणि इतर, ए आय आर १९८३, कलकत्ता २६६***, या न्यायनिवाड्यांचा आधार घेतलेला आहे. वरील सर्व न्यायनिवाड्यांमध्ये मा. न्यायालयाने न्यायालयास दिवाणी प्रक्रीया संहतेचे कलम १५१ प्रमाणे तात्पुत्या मनाई हुकुमाच्या अंमलबजावणीसाठी गंभीर परिस्थितीमध्ये पोलिस संरक्षण देता येऊ शकतो असा निष्कर्ष नोंदवलेला आहे.

**७.** वादीने प्रतीवादीने त्यांना जीवे मारण्याच्या आणि त्यांच्या विरोधात ॲट्रॉसिटीच्या खोट्या केसेस करण्याबाबतची धमकी देऊन दावा मिळकती वरती त्याच्या मालकी बाबतचा बॅनर लावल्याची छायाचित्रे दाखल केली आहेत. परंतु वादीने नि.क्र.४५ वरील अर्जा सोबत पोलिसांना दिलेल्या तक्रारीमध्ये प्रतिवादीने दावा मिळकतीवरती त्याच्या मालकीचा बॅनर लावल्याचा कोणताही उल्लेख केलेला नाही. तसेच त्याने पोलिसांना दिलेल्या तक्रारी वरुन पोलिसांनी प्रतिवादीच्या विरोधात कारवाई केली नसल्याबाबत वरिष्ठाकडे कोणताही पाठपुरवठा केलेला नाही. त्याच बरोबर वादीचा अर्ज मंजुर करावा अशी कोणतीही गंभिर परिस्थीती उद्भवल्याचे दाखवुन दिलेले नाही. त्यामुळे वादीचा अर्ज मंजुर करावा अशी कोणतीही परिस्थीती नसल्यामुळे वादीचा अर्ज मंजुर करता येऊ शकत नाही. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे,

**आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

**स्वाक्षरीत/-**

आर.पी. थोरे.

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सिल्लोड.

सिल्लोड.

दि. ०७.०५.२०२१.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Court | :- Jt. Civil Judge Jr. Division, Sillod. |
| Name of the Stenographer | :- K. P. Patil. |
| Date of pronouncement of Judgment on | :- 07.05.2021. |
| Order signed by the P.O on | :- 07.05.2021. |
| Order uploaded on C.I.S. on | :- 11.05.2021. |

************